# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र-०३** **दिनांक: ०१/०१/२०२४**

## राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन करणारे संशईत पोलीसांच्या ताब्यात

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील चिंचोटी नाका या परिसरामध्ये दिनांक ०१/०१/२०२४ रोजी सकाळी ०९:३० ते १०:०० वाजताच्या सुमारास काहि अनोळखी इसमांनी प्रशासनाला कुठल्याही आंदोलनाची माहिती किंवा निवेदन न देता अचानकपणे एकत्र जमुन वाहनांना अडवून सार्वजनिक वाहतूक थांबविण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीय महामार्गावर मोठया प्रमाणात नियमित चालणाऱ्या वाहतुकीस थांबवून जे वाहन थांबत नाहीत त्यावरील चालकांना दगड, लाठया काठया मारण्याचा धाक दाखवून वाहनचालकांना त्यांच्या वाहनातून हुसकावून लावले तसेच इतर वाहनांवर दगडफेक करण्यास सुरुवात केली.

सदरच्या घटनेची माहिती पोलीसांना मिळताच श्रीमती पोर्णिमा श्रींगी-चौगुले, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२ वसई, श्रीमती पद्‌मजा बढे, सपोआ, वसई विभाग, श्री विनायक नरळे, सपोआ, तुळींज विभाग तसेच नायगाव पोलीस स्टेशन, वालीव पोलीस स्टेशन, पेल्हार पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक व इतर पोलीस अधिकारी/अंमलदार हे तात्काळ चिंचोटी नाका येथिल राष्ट्रीय महामार्गावर घटनास्थळी पोहचले असता महामार्ग अडविणाऱ्या संशईत इसमांनी अचानकपणे पोलीसांच्या वाहनांवरदेखील दगडफेक करुन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले आहे. राष्ट्रीय महामार्गावर अचानकपणे आगळीक करुन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या इसमांना पोलीसांनी तात्काळ ताब्यात घेवुन विचारपुस केली असता संशईतांनी सांगीतले की, केंद्र सरकारने नव्याने पारीत केलेल्या कायदयामध्ये वाहन चालकांना मोठया प्रमाणात दंड व अपघात करुन पळून जाणाऱ्या वाहनचालकाला १० वर्षे शिक्षा होणार असल्याचे निषेधार्थ सदरचा रास्ता रोको केल्याचे सांगीतले. सदर घटनेच्या अनुषंगाने नायगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करुन ताब्यात घेण्यात आलेल्या संशईतांचा घटनेतील सहभाग निश्चीत करुन पुढिल कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया चालू आहे. सदर घटनेच्या ठिकाणी पोलीसांनी तात्काळ पोहोचून वाहतुक सुरळीत करण्यात केली असून व्हॉट्‌अॅपवर अर्धवट माहितीच्या आधारे व्हायरल झालेल्या मॅसेजच्या आधारे कुणीही कायदा हातात घेवुन बेकायदेशीर कृत्य न करण्याचे व आलेले मेसेजेस अधिक व्हायरल न करण्याचे पोलीसांनी जनतेला आवाहन केले आहे.

---ooo---